# कृषि हवामान सल्ला पत्रक, पालघर जिल्हा

**ग्रामीण कृषि मौसम सेवा, जिल्हा कृषि हवामान केंद्र**

**गोखले एज्युकेशन सोसायटी, कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल**

**अंक ८६ /२०२०** **दिनांक २७ /१० /२०२०** **कालावधी ५दिवस**

| मागील हवामान आठवडा सारांश (दिनांक २१/१०/२०२० ते २७/१०/२०२०) सदर हवामान घटकांची नोंद भात संशोधन केंद्र, पालघर येथून घेण्यात आली आहे | | | | | | | हवामानाचे घटक | हवामान पूर्वानुमान (दिनांक २८ /१० /२०२० सकाळी ८:३० पासून ०१ /११ /२०२० सकाळी ८:३० वाजेपर्यंत) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २१/१० | २२/१० | २३/१० | २४/१० | २५/१० | २६/१० | २७/१० | | २८/१० | २९/१० | ३०/१० | ३१/१० | ०१/११ |
| ० | ० | २.६ | ० | ० | ० | ० | पाऊस (मिमी) | ० | ० | ० | ० | ० |
| ३१.५ | ३२.६ | ३२.२ | | | | | कमाल तापमान (अं.से) | ३४ | ३३ | ३५ | ३४ | ३४ |
| २५.४ | २६ | २४.५ | | | | | किमान तापमान (अं.से) | २४ | २४ | २५ | २६ | २६ |
| | | | | | | | मेघाच्छादन (ऑक्टा) | ० | ० | १ | १ | २ |
| ८६ | ९० | ९२ | | | | | सकाळची सापेक्ष आर्द्रता | ६२ | ६१ | ६० | ६२ | ६३ |
| ७५ | ८० | - | | | | | दुपारची सापेक्ष आर्द्रता | ३८ | ३७ | ३८ | ३६ | ४४ |
| २.९ | २.९ | २.७ | | | | | वाऱ्याचा वेग (किमी/तास) | ६ | ४ | ५ | ५ | ६ |
| नै. प. | आ.पू. | उ. | | | | | वाऱ्याची दिशा | ई. पू. | ई. पू. | ई. पू. | ई. पू. | ई. पू. |

| पाऊस (मिमी) मागील आठवड्यातील | पाऊस (मिमी) १/१/२०२० पासून आजपर्यंत | पाऊस (मिमी) गेल्या वर्षीचा |
|---|---|---|
| २.६ | ३११७.६ | ४२३३.४ |

## हवामान आधारित कृषि सल्ला

| पिक | अवस्था | कृषि सल्ला |
|---|---|---|
| **हवामान पूर्वानुमान** | | • **प्रादेशिक हवामान विभाग मुंबई, द्वारे देण्यात आलेल्या अंदाजानुसार पुढील पाच दिवस कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता आहे.**<br>• **विस्तारित श्रेणी अंदाजानुसार दिनांक ३० ऑक्टोबर ते ०५ नोव्हेंबर, २०२० दरम्यान कोंकण विभागासाठी पर्जन्यमान हा सरासरी एवढाच राहील.** |
| **सामान्य सल्ला** | | • कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भात** | **दाणे भरणे ते काढणी अवस्था** | • तयार झालेल्या हळव्या भात पिकाची भात कापणी यंत्राचा उपयोग करून कापणी करावी, जेणेकरून श्रमाची आणि वेळेची बचत होईल. मळणी करून साठवणी अगोदर २ ते ३ उन्हे देऊन धान्य वाळवावे.<br>• गरवे भात दाणे भरण्याच्या अवस्थेत असल्याने भात खाचरात पाण्याची पातळी ५ सें.मी. पर्यंत ठेवावी. निमगरवे भात पक्व होवू लागल्यास कापणी पूर्वी ८-१० दिवस भात खाचरातील पाणी बाहेर काढून टाकावे. |
| **नाचणी** | **काढणी अवस्था** | • तयार झालेल्या नाचणी पिकाची सकाळच्या वेळेस कापणी करून सुरक्षित ठिकाणी ठेवावे व नंतर मळणी करावी. |
| **हरभरा** | **पेरणी** | • भात पीक काढणी झाल्यानंतर हरभरा बियाणावर 2 ग्रॅम थायरम किंवा 5 ग्रॅम ट्रायकोडरमा ने बीज प्रक्रिया करून जमिनीच्या अंगओलीतावर पेरणी करावी. |
| **वाल** | **पेरणी** | • वालाची भात कापणी नंतर जमिनीच्या अंगओल्यावर विनामशागत पेरणी करण्यासाठी भात काढणीनंतर लगेच शेतातील तणांचे ग्लायफोसेट ५ मि. ली. प्रति लिटर पाण्यातून फवारणी करावी. त्यानंतर कोणतीही मशागत न करता टोकण पद्धतीने दोन ओळीत ३० X १५ से.मी. अंतर ठेवून वालाची पेरणी करावी. |

| | | |
|---|---|---|
| **आंबा** | **पालवी फुटणे** | • आंब्याच्या नवीन पालवीवर करपा रोगाचा प्रादुर्भाव दिसून आल्यास रोगाच्या नियंत्रणासाठी १ टक्का बोर्डो मिश्रण किंवा ०.२५ टक्के कॉपर ऑक्झीक्लोराइड २५ ग्रॅम किंवा ०.१टक्का कार्बेन्डाझीम १० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **नारळ** | **फळ धारणा** | • तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने नारळ बागेत माडाच्या बुंध्याभोवती आळे तयार करून ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये गवताचे १५ सें. मी. जाडीचे किंवा काळ्या प्लास्टिक कापडाचे आच्छादन करावे. |
| **केळी** | **वाढीची अवस्था** | • केळीचे झाड वाढत असताना त्याच्या बुध्यापासून अनेक मूनवे येतात ते कापून त्याच्या गाभ्यात चमचाभर रॉकेल ओतावे जेणेकरून ते मूनवे मरतात, या प्रक्रियेमुळे मातृवृक्ष जोमाने वाढतो व केळीचा घड मोठा होतो.<br>• तापमानात वाढ संभवत असल्याने केळी बागेत ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी तसेच आळ्यामध्ये गवताचे १५ सें. मी. जाडीचे किंवा काळ्या प्लास्टिक कापडाचे आच्छादन करावे. |
| **काळी मिरी** | **फळ धारणा** | • तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने मसाला बागेत ७ ते ८ दिवसांच्या अंतराने पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **भाजीपाला** | **रोपवाटिका** | • भाजीपाला रोपवाटीकेतील पिकावर पाने खाणारी अळी, पांढरी माशी, तुडतुडे, मावा इ. किडींचा प्रादुर्भाव दिसून आल्यास नियंत्रणासाठी मेलाथिओन २० मिली किंवा डायमिथोएट १५ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून १० ते १५ दिवसाच्या अंतराने फवारणी करावी.<br>• तापमानात वाढ होण्याची शक्यता भाजीपाला तसेच फळबाग रोपवाटीकेस नियमित पाणी देण्याची व्यवस्था करावी. |
| **पशु पालन** | | • कमाल तापमानात वाढ होण्याची शक्यता असल्याने जनावरांना पिण्यासाठी स्वच्छ पाण्याची व्यवस्था करावी तसेच गोठ्यामध्ये हवा खेळती राहील याची काळजी घ्यावी. |

**सदर कृषि सल्ला पत्रिका गोखले एज्यकेशन सोसायटीचे कृषि विज्ञान केंद्र, कोसबाड हिल येथील तज्ञ समितीच्या शिफारशीनुसार तयार करून प्रसारित करण्यात आली आहे.**

**ई-मेल :kvkkosbad439@gmail.com** **संपर्क:8552882712**

**स्त्रोत**

१) **हवामान पूर्वानुमान** : प्रादेशिक हवामान केंद्र , मुंबई
२) **मागील हवामान** : भात संशोधन केंद्र, पालघर

**ठिकाण** : कृषि विज्ञान केंद्र पालघर
**दिनांक** : २७.१०.२०२०

**स्वाक्षरित**
**प्रमुख अन्वेषक, ग्रामीण कृषि मौसम सेवा - जिल्हा कृषि हवामान केंद्र**
**कृषि विज्ञान केंद्र कोसबाड हिल**